# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२७/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. अशोक भिमराव कुलकर्णी,<br>मु.पो. अंजनगांव (उमाटे),<br>ता. माढा, जि. सोलापूर. | अपेलंट |

**<u>विरूध्द</u>**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सोलापूर.<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु विभाग, बार्शी, जि. सोलापूर<br><br>३) सहाय्यक अभियंता (प्रभारी),<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग, करमाळा, जि. सोलापूर.<br><br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग कुर्डुवाडी, जि. सोलापूर.<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :-** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. बी.डी. नाईकवाडी, सदस्य-सचिव

<u>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. अशोक भिमराव कुलकर्णी, रा. अंजनगांव (उ.), ता. माढा, जि.सोलापूर यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सोलापूर येथे विहित नमुन्यांत अर्ज करून चुकीच्या वीज बिलाबाबत तक्रार केली होती. तथापि त्याकामी कक्षाने विहीत मुदतीत आदेश पारीत न केल्याने त्यांनी दि. २९–६–२००७ रोजी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

श्री. कुलकर्णी यांची प्रमुख तक्रार अशी की त्यांच्या ए.जी. १० शेती पंपाचे मीटर वर वीज कनेक्शन घेतले आहे या कनेक्शनवरून त्यांनी दि. १४–११–२००६ पर्यंत २००० युनीटचा वापर केला असतांना वि.प. यांनी चुकीने बिलामध्ये ५००० युनीट्चा वापर केला असल्याचे दाखविले आहे. त्याबाबत वारंवार कळवून तसेच समक्ष तक्रार मांडुनही वि.प. यांनी त्याची दखल घेतलेली नाही. सबब चुकीचे वीज बील दुरूस्त करून मिळावे.

प्रकरणी सुनावणीची तारीख दि. २३–७–२००७ रोजी बार्शी येथे नेमली होती. त्यावेळी अपीलदार श्री. अशोक कुलकर्णी हे स्वत: उपस्थित होते. वि.प. यांचे वतीने श्री. भाजीभाकरे, कार्यकारी अभियंता, बार्शी विभाग, श्री ठोकळे, सहाय्यक अभियंता, उपविभाग कुर्डुवाडी, श्री. ढाकणे, विभागीय लेखापाल व श्री. पारवे, निम्नस्तर लिपीक उपविभाग कुर्डुवाडी हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी श्री. कुलकर्णी यांनी असे सांगितले की त्यांनी विहित “अ“ मध्ये ए.जी. १० वीज कनेक्शन वरील चुकीच्या बिलाबाबत तक्रार केली आहे. तथापि त्यांची तक्रार ही ए.जी. १०,११ व ५६८ या कनेक्शन बाबत आहे. ए.जी.१० कनेक्शन घेतलेल्या गट नं. ७०७ मधील विहिरीत अपुरा पाणी साठा असल्याने वीज कनेक्शन मीटर प्रमाणे घेतले होते, हॉर्स पॉवर प्रमाणे घेतलेले नव्हते असे त्यांनी सांगितले. या विहिरींत पाणी नसल्यामुळे सन १९९८ ते २००४ या कालावधीत मोटार बंद होती. तरीही मीटर रिडींग न घेता बीले आकारण्यांत आली आहेत व त्याप्रमाणे त्यांनी बिले भरणा केली आहेत. “अ“ नुसार दि. १४–११–२००५ पासून मार्च २००७ पर्यंतच्या ए.जी.१० वरील चुकीच्या वीज बिलाबाबतची त्यांची तक्रार आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दि. १४–११–२००६ पर्यंत त्यांनी २००० युनीट वीज वापरली असतांना वि.प. यांनी ५००० युनीटचा वापर केल्याचे दाखवून त्याप्रमाणे वीज बील आकारले आहे ते चुकीचे तसेच अन्यायकारक आहे. तथापि त्याबाबत आपल्याकडे पुरावा नाही. मात्र युनीटचे वापरापेक्षा जादा रक्कम वि.प. यांना त्यांनी अदा केली आहे. सदरच्या मुदतीची चुकीची बिले दुरूस्त करून देण्यासाठी वि.प. यांचेकडे सतत मागणी केली असतां त्यांनी त्याची दाद घेतली नाही. ग्राहकाने आतापर्यंत वीज बिलापोटी भरणा केलेली रक्कम व प्रत्यक्ष वापरलेल्या युनीटचा मेळ घेऊन दि. १४–११–२००५ ते मार्च २००७ या कालावधीतील चुकीची बिले दुरूस्त करून मिळावीत असे श्री. कुलकर्णी यांनी शेवटी सांगितले.

वि.प. यांचे वतीने उपस्थित असलेले श्री. ठोकळे, सहाय्यक अभियंता उपविभाग कुर्डुवाडी तसेच श्री. ढाकणे, विभागीय लेखापाल, विभागीय कार्यालय, बार्शी हे प्रकरणी पूर्णत: अनभिज्ञ असल्याचे मंचास दिसून आले. श्री. पारवे, निम्नस्तर लिपीक यांनी वि.प.चे वतीने असे सांगितले की तक्रारदार यांनी ए.जी. १० वीज कनेक्शन हे मीटरवरती घेतलेले आहे हे खरे आहे. त्यास अनुसरून ए.जी.१०,११ व ५६८ या कनेक्शनची वीज बिले सप्टेंबर २००५ मध्ये दुरूस्त करून दिली आहेत. मात्र त्यानंतरची बिले मीटर रिडींग न मिळाल्यामुळे सरासरीने काढली आहेत. सदरची बिले डिसेंबर २००६ व मार्च २००७ चे तिमाही बिलामध्ये रिडींग आर.आर. शीटवर भरल्यानंतर

आपोआप कमी होऊन येणार आहेत. श्री पारवे यांनी पुढे असे सांगितले की सप्टेंबर १९९९ ते डिसेंबर २००६ या कालावधीची बिले मीटर रिडींग न घेतां आकारल्याचे सी.पी.एल. वरून दिसून येते ते खरे आहे. तथापि अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सोलापूर यांचेकडील आदेशानुसार डिसेंबर २००६, मार्च २००७ व जून २००७ या तिमाहीची वीज बिले दुरूस्त करण्यांत आली आहेत. त्याप्रमाणे ग्राहकाकडून वीज बिलाच्या रकमेचा भरणा करून घेण्यांत येत आहे.

सुनावणीचेवेळी अपीलदाराने विनंती केल्यावरून मंचाचे अध्यक्ष, सदस्य, सदस्य–सचिव तसेच ग्राहक व वि.प यांनी जागेस दि. २४–७–२००७ रोजी भेट देऊन समक्ष पहाणी केली. सदरचे पहाणीवरून, तसेच सुनावणीचेवेळी तक्रारदार व वि.प. यांनी केलेल्या कथनावरून प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते.

श्री. अशोक भिमराव कुलकर्णी, रा. अंजनगांव (उ.), ता. माढा यांनी आपल्या शेती पंपास सन १९७४ मध्ये मीटरवर आधारीत ए.जी.१० वीज कनेक्शन घेतले होते त्याचा ग्राहक क्र. ३४३३७००११३९१ असा आहे. त्याप्रमाणे सुरूवातीस येणारी बिले ग्राहकाने वि.प. कडे भरणा केली आहेत. त्यानंतर वि.प. यांनी हॉर्स पॉवर वर आधारीत वीज बिलाची आकारणी केल्याची ग्राहकाची तक्रार आहे त्याहीपुढे सप्टेंबर १९९९ ते सप्टेंबर २००६ या कालावधीच्या बिलाची आकारणी मीटर रिडींग न घेता सरासरीने केल्याची ग्राहकाची तक्रार आहे. सरदची तक्रार वाजवी असल्याचे सी.पी.एल. वरून दिसून येत असल्याचे श्री. पारवे यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले आहे. अपीलदाराची तक्रार ही ए.जी. १०, ११ व ५६८ च्या चुकीच्या बिलाबाबत असल्याचे सांगण्यांत आले. तथापि त्यांनी मंचामध्ये विहीत नमुना “अ“ मध्ये दाखल केलेल्या अपीलावरून ए.जी. १० बाबत तक्रार असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे मंचाने तेवढया तक्रारीपुरता विचार करण्याचे ठरविले आहे शिवाय ए.जी. ११ व ५६८ कनेक्शन हे अपीलदारांचे वडील श्री. भिमराव रामचंद्र कुलकर्णी यांचे नांवे आहेत. त्यांच्या तक्रारीचे कक्षाकडून निवारण झाले नाही तर ते मंचामध्ये विहीत मुदतीत अपील दाखल करू शकतात. अपीलदाराची प्रमुख तक्रार अशी की मीटर रिडींग न घेता सरासरीने सप्टेंबर १९९९ पासून डिसेंबर २००६ पर्यंतच्या बिलाची आकारणी केली आहे ती चुकीचे आहे. प्रत्यक्ष मीटर प्रमाणे रिडींग घेऊन चुकीची बिले दुरूस्त करून मिळावीत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत वितरण परवानेधारकाच्या कृतीचे मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५ कलम ९.१ चे तरतुदीनुसार कृषी ग्राहकाच्याबाबतीत मीटर मधील नोंदी घेण्याचे काम हे अधिकृत प्रतिनिधीकडून प्रत्येक तीन महिन्यांतून एकदा करण्याची जबाबदारी वितरण परवानाधारकावर आहे. ते साध्य करण्यास अपयश आल्यास विद्युत अधिनियम २००३ चे अंतर्गत केलेल्या उपरोक्त विनियमाच्या परिशिष्ट “अ“ परिच्छेद ७ मधील तरतूदीनुसार वितरण परवानाधारक हे कृषी ग्राहकाला विलंबाच्या पहिल्या महिन्यांत किंवा त्याच्या भागास रू. १००/– प्रमाणे दंडात्मक भरपाई देण्यास बांधील आहेत. सदरच्या विनियमाची अंमलबजावणी दि. २० जानेवारी २००५ पासून करण्यांत आली असल्याने तेंव्हापासून ग्राहकास सरासरीने वीज बिले देण्यांत आल्याच्या तारखेपर्यंत दंडाची आकारणी होऊ शकते. या तरतूदीचा विचार करून वि.प. यांनी तक्रारदार यांना मीटर रिडींग प्रमाणे बिले दुरूस्त करून देणे योग्य तसेच न्यायाचे होईल असे मंचाचे मत आहे. त्यास अनुसरून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

# **आदेश**

१. अपीलदार श्री. अशोक कुलकर्णी, ग्राहक ए.जी.१०, यांना या आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत मीटर रिडींग प्रमाणे बिले दुरूस्त करून द्यावीत.

२. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतूदीनुसार वि.प.ने मंचास दि. १५–१०–२००७ पर्यंत कळवावे.

३. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

| ( बी. डी. नाईकवाडी ) | ( जी. सी. लेले ) | ( के. व्ही. पाटील ) |
|---|---|---|
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |